Majalgaon Parisar

RNI No. 71499

# माजलगाव परिसर

बीड/सोमवार दि. ०८ ऑगस्ट २०२५ वर्ष ३९ अंक २२ पाने ४ किंमत रु.२.००/—

## अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान — डॉ. किशोर ठाकूर

माजलगाव, दि. ८ (प्रतिनिधी) :— भारतामध्ये अवयव दान करणे काळाची गरज असून त्यासाठी जागृती होणे गरजेचे आहे. यामुळे अनेकांना जीवदान मिळणार असते म्हणून अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे असे प्रतिपादन माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ.किशोर ठाकूर यांनी केले. ते सिद्धेश्वर महाविद्यालयात रासेयो विभाग आयोजित अवयवदान— श्रेष्ठदान या कार्यक्रमात बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे तर उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री




उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. किशोर ठाकूर यांनी अवयवदान याचे महत्व सांगून प्रत्येकांनी अवयवदान करावे तसेच यासाठीची नोंदणी कशी करावी याविषयी मार्गदर्शनही केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, मरावे परी किर्तीरूपी उरावे या उक्तीनुसार आपल्या अवयव दानामुळे जर कोनाचे जीवन उभे राहत असेल तर त्याच्या एवढे महान कार्य नाही. प्रास्ताविक रासेयो कार्यकर्माधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिवशंकर मिटकर यांनी केले तर आभार प्रा.अशोक होके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक तसेच प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.



### आर.जी.कानडे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

माजलगाव येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को—ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीचे चेअरमन माननीय आर जी कानडे साहेब यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना माजलगाव परिसर चे संस्थापक संपादक प्रदीप कुलकर्णी....!

### डॉ. राजेभोसले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

माजलगाव— येथील सुप्रसिद्ध डॉक्टर यशवंत राजेभोसले यांना वाढदिवसा निमीत्ताने हार्दिक शुभेच्छा देवून त्यांचा सत्कार करताना श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे मार्केटींग ऑफिसर किरण काठवटे



## बीड भारत स्काऊट गाईड जिल्हा संस्था बीडच्या वतीने माजलगाव येथे कब बुलबुल स्काऊट गाईड पथक नोंदणी कार्यशाळा संपन्न

बीड:— बीड भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संस्था बीड यांच्या वतीने कब बुलबुल स्काऊट गाईड पथक नोंदणी कार्यशाळा जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी कॅम्प माजलगाव या ठिकाणी घेण्यातआली सर्वप्रथम स्काऊट चे जनक लॉर्ड बेडन पावेल आणि त्यांच्या पत्नी लेडी बेडन पावेल यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले या कार्य शाळेमध्ये पुरुषोत्तम सोळंके सर यांनी विद्यार्थ्यांनी विविध पुरस्कार स्काऊट मध्ये कसे प्राप्त करायचे याविषयी सखोल मार्गदर्शन केले तसेच श्री पुरुषोत्तम काठुळे सर यांनी स्काऊटची चळवळ सेवाभाव त्यावर अवलंबून आहे तसेच शालेय स्तरावर घेण्यात येणारे विविध उपक्रम त्याविषयी सखोल मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांमध्ये संस्कार रुजविण्यासाठी आणि त्यांना भारताचा जबाबदार नागरिक घडवण्यासाठी स्काऊट चळवळ अत्यंत महत्त्वाचे आहे असे मार्गदर्शन केले तसेच बीड भारत स्काऊट गाईड जिल्हा संघटक श्रीमान योगेश अवढाळ सर यांनी फॉर्म कसे भरावेत विद्यार्थ्यांना विविध पुरस्कारासाठी कसे बसवावे तसेच कब बुलबुल स्काऊट गाईड पथकनोंदणी कशी करावी



शिक्षकांसाठी कोणकोणते वेगवेगळे प्रशिक्षण आहेत व ती शिक्षकांनी घ्यावेत याविषयी सखोल मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष अभिमन्यू इबिते सर स्काऊट चळवळ वाढवण्यासाठी तालुका कार्यशाळा घेण्याचे सुचवले आणि सर्व शिक्षक बंधू—भगिनींना सखोल असे मार्गदर्शन केले या कार्यशाळेसाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अभिमन्यू इबिते सर होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून बीड भारत स्काऊट गाईड चे जिल्हा संघटक योगेश सर होते तसेच पुरुषोत्तम सोळंके सर पुरुषोत्तम काठुळे सर कुलकर्णी मॅडम बादाडे मॅडम वाघमोडे मॅडम गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे विस्तार अधिकारी श्रीमान शिवाजी बलसेटवार सर हे होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमान लवुकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमान मतीन शेख सर यांनी केले अशाप्रकारे मोठ्या उत्साहाच्या वातावरणात कब बुलबुल स्काऊट गाईड पथक नोंदणी कार्यशाळा संपन्न झाली या कार्यक्रमासाठी शिक्षक मुख्याध्यापक बंधू—भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते




गेवराई:— ३१ जुलै २०२५ रोजी गेवराई तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे एक यशस्वी व्यवस्थापक श्री शामराव कुलकर्णी सेवानिवृत्त झाले त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल सुलाखे धनंजय सर यांनी लिहिलेला लेख साप्ताहिक प्रकाश आधार या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यात आला लेखाची फोटो फ्रेम श्री शामराव कुलकर्णी यांना देताना साप्ताहिक प्रकाश आधार चे संपादक सुनील पोपळे,

## बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब गोल्डन अवार्डने ॲड रविंद्र कानडे सन्मानित

जालना— दिनांक ५ ऑगस्ट रोजी जालना येथे विभागातील विविध सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या रोटरी क्लब चा पुरस्कार सोहळा संपन्न झाला या सोहळ्यामध्ये माजलगाव रोटरी क्लब चे अध्यक्ष घ्ड रवींद्र कानडे यांना बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब म्हणून गोल्डन अवार्डने सन्मानित करण्यात आले. सन २०२४—२५ या वर्षामध्ये रोटरी क्लब ऑफ मजलगांव सिटी चे अध्यक्ष ॲड रवींद्र कानडे यांनी अनेक सामाजीक,सांस्कृ



तिक,आरोग्य व इतर सेवाभावी उपक्रम यशस्वी राबवले त्यामध्ये प्रामुख्याने आरोग्य,नेत्र, रक्तदान शिबीर त्याचबरोबर वृक्षारोपण,स्टुडेंट टॅलेंट सर्च परीक्षा, शाळेच्या विद्यार्थ्यांना सायकल,स्पोर्ट शूज ,कम्प्युटर,टीव्ही वाटप असे अनेक विविध उपक्रम राबवण्यात आले. या उल्लेखनीय कार्याची विभागीय स्तरावर नोंद घेत त्यांना सन्मानचिन्ह प्रधान करून सन्मानित करण्यात आले.

## कानडे यांच्या वाढदिवसानिमीत्त कपडे व अन्नदानाचे वाटप

माजलगाव — राजे छत्रपती बचत गट आयोजित श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष आर. जी.कानडे व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र कानडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त ओंकार वृद्धाश्रम पाथरी येथे वयोवृद्ध महिला व पुरुष यांना कपडे ड्रेस व अन्नदानाचा अतिशय स्तुत्य उपक्रम घेण्यात आला असता या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजलगाव



व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी व प्रमुख उपस्थिती श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र कानडे यांचे उपस्थित हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी माजलगाव येथील सर्व प्रतिष्ठित व्यापारी वर्ग व मंगलनाथ परिवारातील सर्व अधिकारी उपस्थित होते. आयोजक हनुमान जाधव यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले... हा सर्व कार्यक्रम राजे छत्रपती बचत गट चे हनुमान जाधव व सर्व सदस्य व्यापारी बांधव यांनी स्वखर्चातून केला..

Regd.No.MGN/RSR/CR/1072 Date 28/12/2000

## श्री मंगलनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित माजलगाव

**कार्यालय :– जुना मोंढा माजलगाव जिल्हा बीड**

### आधिमंडळ वार्षिक सभेची सूचना (नोटीस)

**(फक्त सभासदांसाठी)**

**दि. ०७/०८/२०२५**

श्री मंगलनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित माजलगाव चे सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २४/०८/२०२५ वार रविवार या दिवशी दुपारी ठीक १.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात संस्थेच्या अध्यक्षा कानडे जे. आर. यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे तरी आपण सगळेच वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती

**विषय सूची**:–

विषय क्रमांक १.:– मागील दिनांक ११/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांचे वाचन करून त्यास कायम करणे बाबत

विषय क्रमांक २ :– ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरच्या ताळेबंद नफा तोटा पत्रक व तेरिज पत्रक अहवालाचे वाचन करणे व त्यास मान्यता देणे

विषय क्रमांक ३. सन ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत.

विषय कमांक ४. :– सन २०२४–२०२५ चे लेखापरिक्षण अहवाल वाचुन त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक ५:– दि ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ च्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ६:– सन २०२४–२०२५ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ७ :– सन २०२५–२६ या वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे

विषय क्रमांक ८:– महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार परतफेड योजनेअंतर्गत सवलत दिलेल्या थकीत कर्ज खात्याची माहिती देणे व संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे बाबत

विषय क्रमांक ९:– संस्थेच्या नफा वाटणीस मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक १०:– कर्मचा–यांच्या नियुक्तीस मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ११:– सामोपचार कर्ज परतफेड योजनेस मंजुरी देणे व नोंद घेणे

विषय क्रमांक १२:– कर्ज वाटपाचे संबंधित धोरणात्मक नियमावली व ठेवून नियमावली ठरविणे व धोरणात्मक निर्णय घेणे बाबत

विषय क्रमांक १३ :– संस्थेच्या ठेवी व गुंतवणुकीस मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक १४:– श्री मंगलनाथ नागरी सहकारी पत संस्थेचे श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को. ऑप.केडिट सो. लि. माजलगाव या संस्थेमध्ये विलनीकरण करणे बाबत.

विषय क्रमांक १५ :–सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात थकीत कर्ज खात्यात सूट दिलेल्या रकमेस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १६:– :– संस्थेच्या सभासदाकरिता एक रकमी परतफेड योजना राबवणे व कर्ज वसुली बाबत धोरणात्मक निर्णय घेणे बाबत...

विषय क्रमांक १७ माननीय अध्यक्षा साहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे बाबत

**माननीय संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**सचिन कैलासे (व्यवस्थापक)**
**श्री मंगलनाथ नागरी सहकारी पतसंस्था**
**मर्यादित माजलगाव**

स्थळ:– मुख्य कार्यालय माजलगाव
दिनांक:– २४/०८/२०२५
वेळ :– दुपारी ठीक १.०० वाजता

**टीप** :–१.कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही.

२. ज्या सभासदांना अहवाल वर्षातील वर नमूद केलेल्या विषयासंदर्भातील कामकाजाबाबत अधिक माहिती हवी असल्यास अगर आयत्यावेळी काही विषय सुचवायचे असतील तर त्यांनी सभेला हजर राहून आपल्या प्रश्नांची शहानिशा करून घ्यावी. याबाबत योग्य तो निर्णय संचालक मंडळ देईल.

प्रतिलिपी:–

१. मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय माजलगाव.

२. मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कार्यालय बीड.

३. संस्थेच्या नोटीस बोर्डावर

---

Regd.No.MGN/RSR/CR/1089/2014

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेट अॅग्रो को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड माजलगाव

**कार्यालय :– जुना मोंढा माजलगाव जिल्हा बीड**

### आधिमंडळ वार्षिक सभेची सूचना (नोटीस)

**(फक्त सभासदांसाठी)**

**दि. ०७ /०८/२०२५**

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट अॅग्रो को ऑप. सोसायटी लि. माजलगाव चे सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २४/०८/२०२५ वार रविवार या दिवशी दुपारी ठीक ३.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात संस्थेच्या अध्यक्षा कानडे जयदेवी रामेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे तरी आपण सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती

**विषय सूची**:–

विषय क्रमांक १.:– मागील दिनांक ११/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांचे वाचन करून त्यास कायम करणे बाबत

विषय क्रमांक २ :– ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरच्या ताळेबंद नफा तोटा पत्रक व तेरिज पत्रक अहवालाचे वाचन करणे व त्यास मान्यता देणे

विषय क्रमांक ३. :– सन ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत.

विषय कमांक ४. :– सन २०२४–२०२५ चे लेखापरिक्षण अहवाल वाचुन त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक ५:– दि ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ च्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ६:– सन २०२५–२०२६ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ७ :– सन २०२५–२६ या वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे

विषय क्रमांक ८:– संस्थेकरिता लिजवर घेण्यात आलेल्या जमिनीच्या व्यवहारास मान्यता देणे.

विषय क्रमांक ९:– पोट नियम दुरुस्ती बाबत विचार विनीमय करणे व मान्यता देणे बाबत.

विषय कमांक १०. श्री मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेस लिजवर देण्यात आलेल्या जमिनीच्या व्यवहारास मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक ११:– संस्थेच्या व्यवसाय वाढीच्या दृष्टिकोनातून एन सी डी सी या संस्थेकडून कर्ज घेऊन भांडवल उभारने बाबत..

विषय क्रमांक १२:– मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटीज अॅक्ट/नियम २००२ व दुरुस्ती कायदा २०२३ नुसार तसेच मा. केंद्रिय निबंध सहकारी संस्था कार्यालय न्यू दिल्ली यांच्याकडील दिनांक १६.१०.२०२३ रोजीच्या निर्देशानुसार आदर्श उपविधी तसेच इतर आवश्यक दुरुस्त्या संस्थेचा उपविधीत करणे बाबत....

विषय क्रमांक १३:– माननीय अध्यक्षा साहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे बाबत

स्थळ:– संस्थेच्या मुख्य कार्यालयात
दिनांक:– २४/०८/२०२५
वेळ :– दुपारी ठीक ३.०० वाजता

**माननीय संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री मंगलनाथ मल्टीस्टेट अॅग्रो को–ऑपरेटिव्ह**
**सोसायटी लिमिटेड माजलगाव**
**(महाराष्ट्र व कर्नाटक)**

**टीप** :–१.कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही.

२. ज्या सभासदांना अहवाल वर्षातील वर नमूद केलेल्या विषयासंदर्भातील कामकाजाबाबत अधिक माहिती हवी असल्यास अगर आयत्यावेळी काही विषय सुचवायचे असतील तर त्यांनी सभेला हजर राहून आपल्या प्रश्नांची शहानिशा करून घ्यावी. याबाबत योग्य तो निर्णय संचालक मंडळ देईल.

प्रतिलिपी,

१. केंद्रिय निबंधक कार्यालय, न्यु दिल्ली.

२. संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली.

Regd.No.MSCS/CR/404 Date 04/04/2011

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव

**कार्यालय :– जुना मोंढा माजलगाव जिल्हा बीड**

## आधिमंडळ वार्षिक सभेची सूचना (नोटीस)

**(फक्त सभासदांसाठी)**

**दि. ०७ /०८/२०२५**

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड माजलगाव चे सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २४/०८/ २०२५ वार रविवार या दिवशी सकाळी ठीक ११.०० वाजता संस्थेचे मुख्य कार्यालय माजलगाव येथे संस्थेच्या अध्यक्षा कानडे जे. आर. यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे तरी आपण वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे. ही नम्र विनंती

### विषय सूची:–

विषय क्रमांक १.:– मागील दिनांक ११/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांचे वाचन करून त्यास कायम करणे बाबत

विषय क्रमांक २ :– ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरच्या ताळेबंद नफा तोटा पत्रक व तेरिज पत्रक अहवालाचे वाचन करणे व त्यास मान्यता देणे

विषय क्रमांक ३. सन ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत.

विषय कमांक ४. :– सन २०२४–२०२५ चे लेखापरिक्षण अहवाल वाचुन त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक ५:– दि ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ च्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ६:– सन २०२५–२०२६ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ७ :– सन २०२५–२६ या वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे

विषय क्रमांक ८:– गंगाजळीच्या इतर निधीच्या प्रत्यक्ष उपभोक्तेवर विचार विनीमय करणे बाबत.

विषय क्रमांक ९ :– दीर्घ मुदतीच्या भविष्यातील योजना व वार्षिक कृती आराखड्याच्या योजनेवर विचार विनिमय करणे बाबत

विषय क्रमांक १०:– संस्थेच्या नफा वाटणीस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक ११:– कर्मचा–यांच्या नियुक्ती व त्यांना देण्यात आलेल्या जबाबदारीस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १२:– जे कर्जदार संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक आहेत त्यांच्या यादीवर चर्चा करुन मल्टीस्टेट ॲक्ट नुसार त्यांच्या कर्जाबाबत माहिती घेणे व त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक १३:– २०२४–२०२५या कालावधीमध्ये व वार्षिक सभेपुर्वी झालेल्या संस्थेच्या सर्व सभासदांना मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १४:– कर्ज वाटप व सोने तारण कर्ज वाटप या व्यवहाराबाबत विचार विनीमय करणे व त्या व्यवहारास मान्यता देणे.

विषय क्रमांक १५:– कर्ज वाटप व्यवहाराशिवाय व्यवसायीक दृष्टीकोनातुन प्रकल्प उभा करणे, शेती पुरक प्रकल्प उदा. वेअर हावुस, कोल्ड स्टोअरेज प्रकल्प करीता जमिन खरेदी करणे व प्रकल्प उभारणे बाबत.

विषय क्रमांक १६:– सामोपचार कर्ज परतफेड योजनेस मंजुरी देणे व नोंद घेणे.

विषय क्रमांक १७:– कर्ज वाटपाचे संबंधित धोरणात्मक नियमावली व ठेव नियमावली ठरविणे व धोरणात्मक निर्णय घेणे बाबत.

विषय क्रमांक १८:– संस्थेच्या ठेव गुंतवणुकीस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १९:– सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात थकीत कर्ज खात्यास सुट दिलेल्या रक्कमेस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक २०:– संस्थेच्या सभासदाकरिता एक रक्कमी परतफेड योजना राबविणे व कर्ज वसुली बाबत धोरणात्मक निर्णय घेणे बाबत.

विषय क्र. २१. संस्थेच्या विविध प्रकल्पनिर्मीती करीता संस्थेचे मल्टीपर्पज मध्ये रुपांतरीत करण्याकरीता मा. सेंटल रजिस्टार नवी दिल्ली या कार्यालयास प्रस्ताव दाखल करणे बाबत.

विषय क्रमांक २२:– संस्थेच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता बदलणे बाबत. व मुख्य कार्यालयाचे स्थलांतर छत्रपती संभाजीनगर येथे करणे बाबत.

विषय क्रमांक २३:– श्री मंगलनाथ नागरी सहकारी पतसंस्थेचे श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को ऑप.के. सो.लि. या संस्थेत विलीनीकरण करणेस करीता मंजुरी देणे बाबत.

विषय क्रमांक २४:– मंगलनाथ ॲग्रो मल्टीस्टेट को ऑप. सो. लि. माजलगाव संस्थेकडून लीजवर जमिन घेण्यात आलेल्या व्यवहारास मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक २५:–संस्थेच्या व्यवसाय वाढीच्या दृष्टीकोनातून शाखांचा विस्तार करणे करिता नविन शाखा ओपनिंगचा प्रस्ताव मा. सेंटल रजिस्टार या कार्यालयात सादर करणे बाबत.

विषय क्रमांक २६:–संस्थेच्या थकीत कर्ज खाते व न्यालयीन प्रविष्ट कर्ज खात्यांच्या वसुलीकरीता कमिशन तत्वावर वसुली अधिका–यांची नेमणुक करणे बाबत.

विषय क्रमांक २७:– संस्थेच्या सभासदांना कर्ज वाटण्यासाठी तरलता उभारणे करीता एन.सी.डी.सी. या संस्थेकडून कर्ज घेवून भाग भांडवल उभारणे बाबत.

विषय क्रमांक २८:– संस्थेच्या कामकाज संदर्भात मा. श्री आर. जी.कानडे (सेवा निवृत्त लेखा परिक्षक श्रेणी २) संचालक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करणे बाबत.

विषय क्रमांक २९:– माननीय अध्यक्ष साहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे बाबत.

**स्थळ:– मुख्य कार्यालय, माजलगाव जि. बीड**
**दिनांक:– ११/०८/२०२४**
**वेळ :– सकाळी ठीक ११.०० वाजता**

माननीय संचालक मंडळाच्या आदेशावरून
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव**
(महाराष्ट्र व कर्नाटक)

### टीप :–

१.कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही.

२. ज्या सभासदांना अहवाल वर्षातील वर नमूद केलेल्या विषयासंदर्भातील कामकाजाबाबत अधिक माहिती हवी असल्यास अगर आयत्यावेळी काही विषय सुचवायचे असतील तर त्यांनी सभेला हजर राहून आपल्या प्रश्नांची शहानिशा करून घ्यावी. याबाबत योग्य तो निर्णय संचालक मंडळ देईल.

प्रतिलिपी,
१. केंद्रिय निबंधक कार्यालय, न्यु दिल्ली.
२. संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली.

## समर्थ नागरी सहकारी पतसंस्था
## म. माजलगाव जि.बीड

**कार्यालय – पॉवर हावुस रोड , माजलगाव**
**जिल्हा बीड**

### वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी नोटीस

**(केवळ सभासदासाठी)**

दि. ०७/०८/२०२५

समर्थ अर्बन को ऑप क्रे सो. लि. माजलगाव ची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२६/०८/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वा. संस्थेच्या मुख्य कार्यालयात संस्थेचे **अध्यक्ष मा डॉ. संजय जेथलिया** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचारविनिमय करून, निर्णय घेण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे हि विनंती.

**सभेपुढील विषय:–**

१. मागील दि. १५/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन.२०२४–२०२५ च्या वार्षिक ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मान्यता.
३. सन.२०२४–२०२५ च्या लेखा परीक्षण दोष दुरस्ती अहवालाची नोंद घेणे व त्यास मान्यता देणे
४. सन.२०२५–२०२६६ या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन.२०२४–२०२५ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रका पेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
६. सन.२०२५–२०२६ साठी खर्चाच्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
७. सन २०२४–२०२५ या वर्षात झालेल्या नवीन सभासदांना मान्यता देणे.
८. संस्थेच्या ठेवी व गुंतवणुकीस मान्यता देणे.
९. सन २०२४–२०२५ या वर्षातील नफा विभागणीस मान्यता देणे बाबत.
१०. कर्ज वाटप धोरण ठरविणे आणि कर्ज वाटपा संबंधीचे अधिकार देणे बाबत.
११. सभासदांचे राजीनामे स्विकारुन ते मंजूर करणे. व सभासदत्व रद्द करणे बाबत.
१२. आदर्श उपविधी स्वीकारणे बाबत.
१३. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.

स्थळ:– संस्थेचे मुख्य कार्यालय
माजलगाव
सभा दिनांक:– २६/०८/२०२५

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**सचिव**

**टीप**– गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा ठरलेल्या ठिकाणीच ठरलेल्या तारखेसच अर्धा तासानंतर घेण्यात येईल त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारायचे असल्यास त्यांनी आपले प्रश्न संस्थेच्या कार्यालयात सात दिवस अगोदर मिळतील असे पाठवावेत ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळतीलच असे नाही

## महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
## माजलगाव ता.माजलगाव जि.बीड

**आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा**
**(फक्त सभासदांसाठी)**

दि.०७/०८/२०२५

महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित माजलगाव ता.माजलगाव जी.बीड संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की,संस्थेची आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २४/०८/२०२५ रोजी वार– रविवार सकळी–१०.३० वाजता संस्थेच्या मुख्य – कार्यालय 'देशमुख–कॉम्प्लेक्स' धारूर रोड, मोंढा कॉर्नर माजलगाव ता. जी. बीड ४३११३१ या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. रामेश्वर मोहनराव टिळे यांच्या अध्यक्षतेखाली खालील विविध विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ,ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

विषय क्र.१) मागील दि.२५/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्त कायम करणे बाबत.
विषय क्र.२) आर्थिक वर्षे २०२४–२०२५ या वर्षात झालेल्या जमा खर्चास मान्यता देणे बाबत.
विषय क्र.३) सन २०२४–२०२५ अखेरचा ताळेबंद नफा–तोटा पत्रकास व वार्षिक अहवालास मान्यता देने बाबत.
विषय क्र.४) सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षासाठी तयार केलेल्या अंदाज पत्रकास मान्यता देने बाबत.
विषय क्र.५) सन २०२४–२०२५ या आर्थिक वर्षात झालेल्या सर्व नवीन सभासदांना मान्यता देने बाबत.
विषय क्र.६) सन २०२४–२०२५ चे लेखापरीक्षण अहवाल वाचवून नोंद घेऊन दोष–दुरुस्ती अहवालास मान्यता देने बाबत
विषय क्र.७) सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षासाठी वैध्यानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे बाबत.
विषय क्र.८ ) सहकारी पतसंस्थाना शासनाने निर्गमित केलेली सुधारित ष्आदर्श–उपविधिष्लागु करणे बाबत.
विषय क्र.९) रिक्त झालेल्या संचालक मंडळावर नवीन सदस्यांची नेमणुक करणे बाबत.
विषय क्र.१०) ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर अध्यक्षच्या परवानगीने विचारविनिमय करणे बाबत

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**मा. श्री.रामेश्वर मोहनराव टिळे**
अध्यक्ष
महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
माजलगाव.

स्थळ–मुख्य कार्यालय माजलगाव
दि.२४/०८/२०२५ वार–रविवार
वेळ–सकाळी १०.३० वा.

**टिप**–१) वार्षिक सर्वसाधारण सभेत काही प्रश्न अथवा सुचना असल्यास दि.२०/०८/२०२५ पर्यंत संस्थेकडे लेखी कळवावे अन्यथा त्याचा विचार करणे बंधनकारक नाही.
२) पतसंस्थे विषयक काही माहिती आवश्यक असल्यास वरील मुदतीत संस्थेत उपलब्ध आहे.
३) दि.३१/०३/२०२५ पुर्वी सभासद असतील त्यांनाच या सभेत सहभाग घेता येईल.

## आधार मल्टीस्टेट को ऑप. केडिट सोसायटी लि. अंबाजोगाई राजा बन्सीलाल नगर अंबाजोगाई.
### ता. अंबाजोगाई जि. बीड

**अधिमंडळ वार्षिक सर्व साधारण सभेची सूचना**
**(फक्त सभासदांकरिता)**

दिनांक ०८/०८/२०२५

या संस्थेच्या सर्व सभसदांना कळविण्यात येते की संस्थेची १३ वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दि. २४/०८/२०२५ रोजी दुपारी ठिक २.०० वाजता, अजिंठा हॉल, अंबाजोगाई येथे संस्थेचे चेअरमन मा. श्री ॲड. सुनिल सौंदरमल यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१. मागील दि.२२/०९/२०२४ रोजीच्या वार्षिक सभेचे इतीवृत्त वाचून कायम करणे.
२. सन ३१/०३/२०२५ अखेरच्या जमा–खर्च, ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा व लाभांश विभागणीस मंजुरी देणे.
४. सन २०२४–२०२५ च्या लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन नोंद घेणे. व दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
५. संस्थेच्या संचालक मंडळाचे नातेवाईक असलेल्या कर्मचा–यांची यादी प्रसिद्ध करणे.
६. नविन शाखा सुरु करण्याबाबत विचार विनिमय करणे.
७. सभासदांनी सभेच्या तिन दिवस अगोदर विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देणे.
८. MSCS ACT 2002 Sec.62 मध्ये झालेल्या महत्वाच्यका बदलांचा स्वीकार करुन त्याची अंमलबजावणी करणे.
९. सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करुन घेण्यासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
१०. मा. सभा अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे.

स्थळ:– अजिंठा हॉल, दुसरा मजला,
राजा बन्सीलाल नगर अंबाजोगाई
**सभा दिनांक – २४/०८/२०२५**
**वेळ दुपारी २.०० वाजता.**

मा. संचालक मंडळाच्या
आदेशावरुन
**विजय राऊत**
मुख्य कार्यकारी अधिकारी

टीप– गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा ठरलेल्या ठिकाणीच ठरलेल्या तारखेसच अर्धा तासानंतर घेण्यात येईल त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारायचे असल्यास त्यांनी आपले प्रश्न संस्थेच्या कार्यालयात सात दिवस अगोदर मिळतील असे पाठवावेत ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळतीलच असे नाही

हे पत्रक साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक **सौ. आनंदी प्रदीपराव कुलकर्णी** यांनी क्षितिज प्रिंटिंग होम चिंचगव्हाण ता. माजलगाव जि.बीड येथे छापुन सा माजलगाव परिसर कार्यालय , परिसर भवन चिंचगव्हाण ता. माजलगाव जि.बीड येथे प्रकाशित केले.
**संपादक :– सुषमा जयंत देशमुख** मो. 7020203749
**This Weekly News Paper Owner, Printer,Publisher Sow Anandi Pradiprao Kulkarni printed at Kshitij Printing home Chinchgavan Tq. Majalgaon Dist Beed and Publised at office of The Majalgaon Parisar, Parisar Bhavan Chinchgavan Majalgaon Dist Beed (Maharashtra)**
**Editor :- Sushma Jyant Deshmukh** **Email- majalgaonparisar@gmail.com**